
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र अधिविभागात सोमवारी विद्यार्थ्यांना धडे देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## संख्याशास्त्रातील धडे देत अधिविभागाचा निरोप

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू तथा संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज विद्यार्थ्यांना विविध धडे देत अधिविभागाचा निरोप घेतला. खडू, फळ्याच्या सहाय्याने पारंपरिक पद्धतीने त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

चाळीस वर्षांपूर्वी जून १९८५ मध्ये डॉ. शिर्के हे विद्यार्थी म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात दाखल झाले. तेव्हापासून त्यांची संपूर्ण कारकीर्द शिवाजी विद्यापीठातच घडली. शिक्षक ते अधिविभाग प्रमुख पदापर्यंत आणि प्रशासनातील कुलसचिव पदापासून ते कुलगुरू पदापर्यंत त्यांनी सर्व पदे भूषवली. प्रशासनात असतानाही त्यांनी वेळोवेळी अधिविभागामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आज अखेरच्या मार्गदर्शन सत्रासाठी अर्धा तास आधीच संख्याशास्त्र अधिविभागात ते उपस्थित झाले. त्यांनी 'स्टॅटिस्टिकल सिम्युलेशन अँड इट्स ॲप्लिकेशन्स' या विषयावर अतिशय सोप्या पद्धतीने, सुसंगत उदाहरणांसह मार्गदर्शन केले. अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनच्या 'दि अमेरिकन स्टॅटिस्टिशियन' या मान्यताप्राप्त शोधपत्रिकेमध्ये १९९१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका शोधनिबंधातील 'आयलस कॉन्स्टंट' संदर्भातील संख्याशास्त्रीय सिद्धांत, संकल्पना त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


01 JUL 2025
लोकमत

# स्मार्ट क्लासरूममध्ये कुलगुरूंनी घेतले खडू

## फळ्यावर लेक्चर, डॉ. डी. टी. शिर्के शिक्षक म्हणून निवृत्त

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू तथा संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांच्या शिक्षक म्हणून अखेरच्या दिवशी विद्यार्थ्यांसमोर लेक्चर देऊन अधिविभागाचा निरोप घेतला. नियत वयोमानानुसार डॉ. शिर्के सोमवारी संख्याशास्त्र अधिविभागातून शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले. साधारण ४० वर्षांपूर्वी जून १९८५ मध्ये डॉ. शिर्के हे विद्यार्थी म्हणून विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात दाखल झाले. तेथपासून ते आजतागायत त्यांची संपूर्ण कारकीर्द विद्यापीठातच घडली. शिक्षकापासून ते अधिविभाग प्रमुखपदापर्यंत आणि प्रशासनातील कुलसचिवपदापासून ते कुलगुरूपदापर्यंत त्यांनी सर्व पदे यशस्वीरीत्या भूषविली. प्रशासनात असतानाही त्यांनी वेळोवेळी अधिविभागामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, अध्यापन केले. शिक्षक म्हणून अखेरच्या दिवशी विद्यार्थ्यांसमोर खडू, फळ्यावर लेक्चर घ्यावयाचे, अशी सुप्त इच्छा डॉ. शिर्के यांच्या मनी होती. ती त्यांनी त्यांच्या शिक्षकपदाच्या अखेरच्या दिवशी पूर्ण केली. त्यांनी 'स्टॅटिस्टिकल सिम्युलेशन अँड इट्स ॲप्लिकेशन्स' यावर सोप्या पद्धतीने सुसंगत उदाहरणांसह व्याख्यान दिले.



शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात शिक्षक म्हणून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी अखेरचे लेक्चर घेतले.

सकाळ

# प्रेमाचा धागा माणसाला जगण्याची उमेद देतो : डॉ. पी. एस. पाटील

कोल्हापूर, ता. ३० : मानवी जीवनात प्रेमाला अग्रस्थान आहे. संपूर्ण मानवी जीवन प्रेमाभोवती फिरत आहे. प्रेम मानवी संस्कृतीचा सारांश आहे आणि प्रेम मानवी जीवनाचा अभ्युदयही आहे. प्रेमाचा धागा माणसाला जगण्याची उमेद देतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांच्या 'मराठी प्रेमकविता : अस्तित्ववादी दृष्टिकोनातून' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पै. विष्णू जोशीलकर होते. मराठी साहित्यात प्रेमावर फारसं लिहिलं गेलं नाही.

जोशीलकर म्हणाले, 'चंदगड तालुक्यामध्ये अनेक रत्ने जन्माला आलेली आहेत. डॉ. गोपाळ गावडे यांचे कार्यही कौतुकास्पद आहे'. बाळासाहेब बांदिवडेकर, जे. बी. पाटील, भिकाजी दळवी, शशिकांत जाधव, प्राचार्य डॉ. राजेखान शाणेदिवान, प्राचार्य डॉ. जी. पी. मांळी, प्राचार्य डॉ. दत्ता पाटील, प्रा. डॉ. अनिल गवळी, अरुण काकडे, डॉ. सुप्रिया आवारे, भीमराब चिमणे, प्राचार्य विजय डोणे, डॉ. अंकुश बनसोडे, डॉ. गोमटेश्वर पाटील, प्रा. डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. उषा पाटील उपस्थित होते स्वागत व प्रास्ताविक डॉ. विनोद कांबळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय राजेंद्र कारंडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रांजली खबाले-क्षीरसागर यांनी केले. मनोज जाधव यांनी आभार मानले.

पुढारी

# 'दूरशिक्षण' अभ्यासक्रमांसाठी आजपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्रांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व एआयसीटीई मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. १ जुलैपासून विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील लिंकवर ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे.

डिस्टन्स मोडमधील (पदव्युतर) एमए (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र यासह एमबीए, एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम.चा समावेश आहे. तसेच ऑनलाईन मोडमधील पदव्युतर अभ्यासक्रमांतर्गत एमबीए, एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. तसेच सर्टिफिकेट कोर्सेस- डिस्टन्स व ऑनलाईनचा समावेश आहे. ३१ जुलैपर्यंत अर्जाची मुदत आहे. प्रवेशाबाबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी परिपत्रक काढले आहे.

पुढारी

# शिवाज़ी विद्यापीठाकडून ६८६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर सुमारे ६८६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बीबीए, एमबीए (इंटिग्रेटेड प्रोग्राम) या दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. दि. ३० रोजी एमएस्सी (झूलॉजी), एमएस्सी (बायोकेमेस्ट्री), एमएस्सी (फार्मासिटीकल मायक्रोबायोलॉजी), एमसीए, एमएस्सी (एजीपीएम), एमएस्सी (फिजिक्स) आदी ७१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरूण भारत



कोल्हापूर : 'बांध' एकांकिकेमधील विद्यार्थ्यांना गौरविताना डॉ. अजित कोळेकर.

# 'बांध' एकांकिकेचे विविध स्पर्धेत यश

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'बांध' या एकांकिकेने या वर्षी विविध नामवंत सांस्कृतिक स्पर्धांमध्ये दर्जेदार कामगिरीचे प्रदर्शन करीत उल्लेखनीय यश मिळविले आहे. अधिविभागाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने सादर झालेल्या एकांकिकेने जी.एस. रायसोनी करंडक, पुरुषोत्तम करंडकासह मनोरंजन करंडक आदी स्पर्धांमध्ये भाग घेत ठसा उमटवला.

तंत्रज्ञान अधिविभागाच्या कलासंपन्न विद्यार्थ्यांनी 'बांध' या एकांकिकेच्या माध्यमातून सृजनशीलता आणि सांघिक भावना जोपासल्यानेच त्यांना विविध स्पर्धांत घवघवीत यश संपादन करता आले, असे प्रतिपादन अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी केले. या विद्यार्थ्यांना अधिविभागात गौरविण्यात आले.

एकांकिकेतील कलाकार असे : दृप्ता कुलकर्णी, वेदांत मोरे, नेहा सावंत, ज्ञानेश पाटील, शुभम भिलारे, श्रीधर निंबाळकर, वेदांत कारंडे, साक्षी जाधव, गणेश मडिवाल, भूषण चांदणे, हर्षदा लोंढे, श्रुतिका शेळके, हर्षिता परब, पूर्वा सावंत, रेणुका घरात, सौरभ जगताप या कलाकार विद्यार्थ्यांनी विविध भूमिका केल्या आहेत.

01 JUL 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञानाने शिक्षणाला मिळाले नवे रूप

## ई-लर्निंग, स्मार्ट क्लासरूम; बदलत्या काळानुसार वाटचाल

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून बदलत्या काळानुसार वाटचाल करत नवी पिढी घडविण्यात कोल्हापुरातील महाविद्यालये योगदान देत आहेत. शैक्षणिक गुणवत्ता जपत आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करत त्यांनी शिक्षणाला नवे रूप दिले आहे. महाविद्यालयांचे बदलते स्वरूप मांडणारी वृत्तमालिका आजपासून.**

■ संतोष मिठारी :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची दूरदृष्टी आणि कार्यात्मक संस्कारामुळे कोल्हापूर शहराचा शैक्षणिक विकास प्रारंभापासून होत गेला. त्यात सुरवातीला कला, वाणिज्य, विज्ञान या पारंपरिक विद्याशाखांचे शिक्षण दिले जात होते. त्यात राजाराम महाविद्यालयाची एक वेगळी ओळख होती. त्यानंतर १९६२ मध्ये शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली आणि महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीतील बदलाचा बिगुल वाजला. सुरवातीला अगदी बोटावर मोजण्याइतकी महाविद्यालये होती. ग्रामीण भागातील अधिकतर विद्यार्थ्यांना कोल्हापूर शहरात शिक्षणासाठी यावे लागते होते. वर्षागणिक शहर आणि जिल्ह्यातील महाविद्यालयांची संख्या वाढली आणि आता ती १२९ पर्यंत पोहोचली आहे.

या महाविद्यालयांनी पाच वर्षांपासून बदलत्या काळानुसार नवतंत्रज्ञान आत्मसात करून वाटचाल सुरू केली आहे. कोरोनानंतर तर तंत्रज्ञान स्वीकारण्याचे प्रमाण वेगाने वाढले. स्मार्ट आणि डिजिटल क्लासरूम, इंटरॲक्टिव्ह बोर्ड, ई-लर्निंग प्लॅटफॉर्मवर विवेकानंद कॉलेज, डीआरके कॉमर्स कॉलेज, गोखले कॉलेज आदी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

न्यू कॉलेजने ई-लर्निंग अंतर्गत ई-कंटेंट निर्मितीसाठी स्वतःचा स्टुडिओ उभारला आहे. बहुतांश महाविद्यालयांत डिजिटल आणि इंटरॲक्टिव्ह बोर्डचा सर्रास वापर केला जात आहे. त्याने पूर्वीच्या तुलनेत अधिक परिणामकारक शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध झाले. त्याचा गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने चांगला फायदा विद्यार्थ्यांसह महाविद्यालयांनाही झाला. नवतंत्रज्ञान महाविद्यालयांनी स्वीकारल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थीही या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रवाहात आले आहेत.



कोल्हापूर : न्यू कॉलेजने ई-लर्निंग अंतर्गत ई-कंटेंट निर्मितीसाठी स्वतःचा स्टुडिओ उभारला आहे.



कोल्हापूर : महाविद्यालयांमध्ये इंटरॲक्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे.



बदलती महाविद्यालये

भाग- १

### व्हॉटस्‌ॲप, इन्स्टाग्रामवर नोटस्

सोशल मीडियावरील व्हॉटस्‌ॲप, इन्स्टाग्राम या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करून त्यावर महाविद्यालयांतील प्राध्यापकांकडून नोटस् पाठविल्या जातात. प्रथम, द्वितीय, तृतीय असे वर्षनिहाय ग्रुप तयार केले आहेत. त्यात परीक्षा, शैक्षणिक उपक्रमांची माहितीही विद्यार्थ्यांना दिली जाते. परीक्षाविषयक कामात गुगल फॉर्मचा वापर केला जातो. गुगल क्लासरूम, मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्स (मूक), यू-ट्यूब, स्वयंम, दीक्षा प्रणालीचा उपयोग करण्यात येत आहे. झूम, वेबेक्स, गुगल मीटच्या माध्यमातून ऑनलाईन लेक्चर घेण्यात येत असल्याचे विवेकानंद कॉलेजचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांनी सांगितले.

### 'लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम'चा वापर

बहुतांश महाविद्यालयांनी लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमचा (एलएमएस) वापर सुरू केला आहे. त्यावर ऑडिओ-व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. नैसर्गिक आपत्ती अथवा काही कारणास्तव विद्यार्थ्यांना वर्गात येणे शक्य नसल्यास त्यांना या सिस्टीमच्या माध्यमातून घरबसल्या अथवा कुठूनही आणि कधीही शिक्षण घेता येते. 'एलएमएस'च्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याची निर्मिती, विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासह मूल्यांकनही महाविद्यालयांकडून केले जात आहे.

### दृष्टिक्षेपात जिल्हा

| तालुका | महाविद्यालये | शिक्षक | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|---|---|
| करवीर | ४० | १२८६ | २३९७६ | २०९७९ |
| हातकणंगले | २२ | ५३७ | ९३७३ | ८३२८ |
| पन्हाळा | १३ | ३११ | ५७९४ | ३३५३ |
| गडहिंग्लज | १३ | ४५२ | ६१४१ | ५३१४ |
| कागल | ९ | १७० | ३०३१ | ३७४७ |
| शिरोळ | ८ | ११६ | ३१०५ | २६२१ |
| चंदगड | ६ | १३८ | २२७४ | २००४ |
| राधानगरी | ६ | ९१ | ७९१ | ९७९ |
| शाहूवाडी | ५ | ९१ | ११५८ | १३३५ |
| भुदरगड | ३ | ५३ | १३३३ | १५०७ |
| आजरा | २ | २९ | ११०८ | ८३८ |
| गगनबावडा | २ | ६८ | १४७८ | ५०० |
| एकूण | १२९ | ३३५० | ५९५६२ | ५१५०५ |

"पुस्तकांबरोबरच डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. महाविद्यालयांच्या बदलत्या स्वरूपाचा चांगला परिणाम दिसून येत आहे. विद्यार्थ्यांचाही त्याला सकारात्मक प्रतिसाद आहे.
- डॉ. व्ही. एम. पाटील, सचिव,
शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयांनी बदल स्वीकारले आहेत. त्यात इंटरॲक्टिव्ह बोर्ड, डिजिटल-स्मार्ट क्लासरूममुळे शिक्षण देण्याच्या पद्धतीला आधुनिक स्वरूप मिळाले असून, ते निश्चितपणे विद्यार्थी, महाविद्यालयांना उपयुक्त ठरत आहे.
- डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य, विवेकानंद कॉलेज